# कुंडली अभ्यास

**राहुल प. कदम**
**ज्योतिषशास्त्री**
ज्योतिर्विद्या भूषण
ज्योतिर्विद्या कोविद
कृष्णमूर्ती विशारद

**ॐ पब्लिकेशन्स्**

प्रमुख वितरक
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**कुंडली अभ्यास : Kundali Abhyas**
राहुल प. कदम

**© राहुल प. कदम**

संचालक : अनुभूती ज्योतिषालय आणि
वेदांग ज्योतिष अभ्यास मंडळ,
फ्लॅट नं. ११, वरद रेसिडेन्सी,
२८०६/२- बी, मंगळवार पेठ,
(स्वयंवर मंगल कार्यालयाजवळ)
कोल्हापूर. संपर्क : ०२३१-२६४०९७०

**प्रकाशक**
ॐ पब्लिकेशन्स्
६७८, सृष्टी विष्टा, निदान समोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
मयूर कुलकर्णी
(अॅड वे, कोल्हापूर.)

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स

**आवृत्ती**
सप्टेंबर, २०१२

**किंमत**
रुपये १००/-

# मनोगत

आजकाल समाजामध्ये अध्यात्म व ज्योतिष या दोन गोष्टींकडे लोकांचा कल वाढलेला आपणांस दिसून येतो. वास्तविक पाहता या दोन्ही गोष्टी हिंदू संस्कृतीमध्ये वेदकाळापासून अस्तित्वात आहेत. मात्र काळाच्या ओघात ज्याप्रमाणे प्रत्येक विषयास मालिन्य येत जाते; तद्वतच काही काळापूर्वी ज्योतिष या विषयाबद्दलचे अर्धवट ज्ञान असलेल्या लोकांनी या शास्त्राबद्दल बरेचसे गैरसमज समाजामध्ये पसरवल्या कारणाने या शास्त्राचे महत्त्व कमी झाले होते. मात्र आजकालचा सुशिक्षित वर्ग ज्योतिषाचा शास्त्र म्हणून अभ्यास करू लागल्यामुळे या शास्त्राची उपयुक्तता समाजास जाणवू लागली आहे. आजचा या शास्त्राचा प्रसार व समाजातील आवड पाहता गेल्या काही वर्षांपासून ज्योतिषविषयक शिक्षण देणाऱ्या बऱ्याच संस्था व वर्ग उदयास आलेले आपणास दिसून येतात. आजकालच्या धावपळीच्या व अस्थिर जीवनात स्थिरता शोधण्यासाठी, मनुष्य अध्यात्म व ज्योतिष या गोष्टींकडे वळलेला आहे. यातील अध्यात्म विषय वैयक्तिक उन्नतीस पोषक असून ज्योतिषशास्त्राच्या माध्यमातून मनुष्याचे भविष्यातील जीवन सुखकर करण्याचे प्रयत्न होत असलेने त्याचा ओढा ज्योतिषशास्त्राकडे जास्त पाहावयास मिळतो. निसर्गनियमानुसार ज्यावेळी एखाद्या गोष्टीची वाढ होऊ लागते तेव्हा त्यासोबत काही इतर गोष्टीदेखील वाढत असतात त्याप्रमाणे ज्योतिषशास्त्राच्या प्रसारासोबतच त्याच्या आड काही अपप्रवृत्ती देखील वाढीस लागलेली दिसून येते. मुळात ज्योतिषशास्त्राची निर्मिती ही मनुष्याच्या जीवनातील अडचणींवरती मात करून जीवन सुखकर होण्यासाठी केलेला प्रयत्न आहे. ज्योतिषशास्त्रास वेदांचे चक्षू म्हणजेच नेत्र मानले गेले

असल्याने या शास्त्राची महती आपल्या लक्षात येते. मुळात ज्योतिषशास्त्र हे सिद्धांत, संहिता व होरा अशा तीन विभागांत विभागले गेलेले असून त्यामध्ये अनुक्रमे ग्रह-गणित, ग्रहांच्या भ्रमणांवरून मिळणारी शुभ-अशुभ फळे व मनुष्याच्या जन्मकाळ स्थितीवरून त्याच्या आयुष्यातील सुख-दुःखांचा विचार केला जात असल्याने प्रत्येक मनुष्यास आपले आयुष्य अधिक सुखकर व समृद्ध बनविण्यासाठी या शास्त्राचा वापर करून घेणे हिताचे ठरते. हे सर्व पुस्तकाद्वारे अधिकाधिक सोप्या व सुलभ भाषेमध्ये आपणासमोर मांडण्याचा हा छोटासा प्रयत्न.

धन्यवाद !

# प्रस्तावना

*''राहुल गुरुजींनी हे पुस्तक लिहून पूर्ण केलं... पण नेमकं पुस्तक प्रकाशनाची प्रोसिजर सुरू असताना ते स्वत: येथे उलपब्ध नाहीत. कारण, ते 'नर्मदा परिक्रमा' करण्यासाठी रवाना झाले आहेत. त्यांची ही परिक्रमा पूर्ण होईपर्यंत हे पुस्तकही प्रकाशित झालेले असेल, यात शंका नाही ! त्यांच्या या आध्यात्मिक 'नर्मदा परिक्रमा' उपक्रमास मन:पूर्वक शुभेच्छा...!!''*

...अचानक ५-७ महिन्यांच्या त्या कालावधीत मी जोडलेली- कित्येक वर्षे मला मानणारी- माझा काहीसा आधारही घेणारी माणसं माझ्यापासून तुटत चालली होती. माझ्याच क्षेत्रातली असुरक्षित मंडळी मुद्दाम या क्षेत्रात माझ्या बाबतीत गैरसमज पसरवण्याची कारस्थानं करीत होती. (नुकताच मी झी मराठी वाहिनीच्या 'हास्यसम्राट' या रिॲलिटी शोचा उपविजेता म्हणूनही प्रचलित झालो होतो.) मी रंगकर्मी असलो तरी तसा स्पष्ट आणि सडेतोड वृत्तीचा. त्यामुळे माझ्या जिभेनं अनेक चुकाही केल्या होत्या; पण अशा गोष्टींचाच अपप्रचार करत कारस्थानं घडत होती... अगदी ज्येष्ठ माणसांकडूनही...! एका बाजूनं कलाकार म्हणून रसिकांकडून प्रेम-प्रसिद्धी आणि काही अंशी पैसा हे सारं व्यवस्थित मिळतं होतं; पण या काही भावनिक-मानसिक ठेच देणाऱ्या घटनांमुळं घराकडंही दुर्लक्ष करून कष्टानं उभं केलेलं कलात्मक घर (नाट्यसंस्था-नाट्यचळवळ-रंगकर्मी म्हणून असलेलं स्थान) मोडकळीस येतंय किंवा नष्ट पावतंय असा भास होऊ लागला... यश-प्रसिद्धी काहीशी बरोबर असताना देखील प्रचंड भावनिक-वैचारिक अस्वस्थता वाढत होती. समोर उगाचच अंधार दाटल्यासारखं भासू लागलं... बराच खचलो आणि अनेक ज्योतिषी-देवऋषि यांना शोधत गेलो, भेटत गेलो. विवंचना कथन करत गेलो... थोडक्यात, अशी वेळ आल्यानंतर जास्तीत जास्त माणसं जे करतात तेच करत गेलो, हे पण तितकंच खरं...!

तसं मला अध्यात्म आणि ज्योतिष या गूढ शास्त्राबाबतीत शालेय वयापासूनच आकर्षण... त्यामुळे या शास्त्राचं बऱ्यापैकी वाचनही करत आलो. पण ही शास्त्रंच इतकी जटिल की, मी केलेला अभ्यास म्हणजे ०.०१% ही नसावा. (त्यात थोडं अध्यात्म, थोडं हस्तरेषा शास्त्र आणि थोडं अंकशास्त्र याच प्रकारचा काहीसा अभ्यास माझा.) काही वेळा ज्योतिषशास्त्रातल्या महत्त्वाच्या प्रभावी आणि तंतोतंत अशा 'कुंडलीशास्त्राची' पुस्तकं मी वाचायला घेतली आणि ५-६ पानं वाचून बंदही केली. कारण ती भाषाच मला झेपली नाही...! **अनेक वेळा मला प्रश्न पडतो, हे शास्त्र कितीही गूढ असलं तरी लेखकांनी भाषा एवढी गूढ आणि अवघड का वापरावी??? त्यामुळे 'कुंडली' हे गूढ कुणीतरी साध्या आणि सोप्या भाषेत विश्लेषित करावं, असं मला नेहमीच वाटत आलं.** ती अपेक्षा आज पूर्ण होतेय, याचा सार्थ आनंद वाटतो.

एकूणच या ज्योतिषशास्त्राच्या थोड्याफार वाचनामुळं समोर आलेला ज्योतिषी योग्य आहे की अयोग्य याचा आनंद येण्याइतपत नक्कीच दृष्टिकोन निर्माण झाला होता. पण म्हणतात ना 'अडला हरी... गाढवाचे पाय धरी...!' ती वेळच अशी आलेली असते की, विचार व्यवस्थित जागरूक असले तरी वर्चस्व मात्र बहुतेक वेळा भावनेचं आणि मनाचंच राहतं आणि चुका घडत राहतात. हा आपल्यालाही अनुभव असायला हरकत नाही. नेमकं अशाच वेळी योग्य माणूस सापडणं गरजेचं असतं. पण वेळ यावी लागते हेही खरंच...! त्यावेळी तर, मी अमुक देवाचा भक्त आहे, तमुक देवीचा पूजक आहे, मी या या नेत्याला मार्गदर्शन करतो, त्या-त्या नेत्याचे प्रश्न सोडवतो असे सांगून अनेकांनी मला लुबाडले. किंबहुना मीच आपली बुद्धी, आपला दृष्टिकोन बाजूला ठेवून बळी पडलो असेही म्हणायला हरकत नाही.

अशा अनेक घटना घडत असतानाच मदन दाभाडे नावाच्या माझ्या मित्राकडून 'राहुल कदम' या व्यक्तीशी माझी ओळख झाली. (मदन त्यावेळी त्यांचा कुंडलीशास्त्राचा विद्यार्थी होता.) मित्राकडून ते **'ज्योतिषशास्त्री'** आहेत असे समजले. ज्योतिषशास्त्री म्हणजे काय? याची उकल अर्थात मला नंतर झाली. **ज्योतिर्भूषण आणि ज्योतिर्कोविद** ही दोन पदं आपण मिळवली पाहिजेत म्हणजेच या दोन परीक्षा पास असाल तरच ज्योतिषशास्त्री होण्याच्या परीक्षेसाठी बसण्यास आपण पात्र ठरतो. पण या दोन परीक्षा उत्तीर्ण असल्या तरी परीक्षार्थींचा

या विषयातील स्वत:चा सर्वांग दृष्टिकोन कितपत तयार आहे हे तपासले जातेच. अन्यथा ज्योतिषशास्त्रातील १० वर्षांचा अनुभव आपणास असावा लागतो. तो आपल्या अभ्यासात्मक विवेचनानुसार सिद्ध करावा लागतो. तरच ज्योतिषशास्त्री या परीक्षेस बसता येते... आणि उत्तीर्ण झाल्यावरच त्या व्यक्तीस 'ज्योतिषशास्त्री' ही बिरुदावली लावता येते. ही परीक्षा महाराष्ट्र राज्य ज्योतिष परिषदेतर्फे घेतली जाते. त्याबरोबरच राहुल कदम **'कृष्णमूर्ती विशारद'** ही आहेत.

राहुल कदम मूळचे कराडचे, पण वास्तव्याला कोल्हापुरात त्यांच्या मामाकडे असतात. अनेक वेळा चकरा मारल्यानंतर त्यांची भेट होण्याचा एकदा योग आला. त्यांच्या खोलीवजा ऑफिसमध्ये गेलो. त्यांनी मला पाहताच हातानेच बसण्याची खूण केली. मी बसलो. माझ्याकडून निरीक्षण सुरू होतंच... (कारण बरेच धक्के होते पाठीशी) जुन्या पद्धतीच्या त्या डेस्कवर लॅपटॉप ठेवला होता. त्यामध्ये कुंडली उघडून समोरच्याला त्यांचं सल्ला देणं सुरू होतं. स्वत:पुरती छोटीशी घोंगडी अंथरून त्यावर अलकट पालकट घालून समोरच्या डेस्कवर हात रेलून बसलेली ती व्यक्ती मी न्याहाळत होतो... अगदीच सामान्य लुक... बऱ्यापैकी जाड-जूड... गोल चेहरा... रंग काळा-सावळा... कपड्यांची स्टाईल वगैरे पाहता प्रथमदर्शनी कोणत्या तरी सहकारी संस्थेत क्लार्क पदावर काम करणारा हा माणूस असावा असा भास व्हायला काहीच हरकत नाही ! (कारण, मी प्रत्यक्षात टीव्हीवर आपण पाहताचक्षणी संमोहित व्हावं अशा मोठाली रत्नं, रुद्राक्षांच्या माळा, कलात्मक ब्रेसलेट्स, मोठा गंध, कुंकुम तिलक, झब्बा-पायजमा धारण केलेल्या व्यक्ती पाहिल्या. ज्योतिषशास्त्री पाहिल्यावर तसा अपेक्षाभंगच झाला.) असो, माझी नंबर आला. माझ्या स्वभावानुसार मी त्यांचा बराच वेळ घेतला. बऱ्याच गोष्टींची उकल झाली... उपाय-उपासना जाणून घेतल्या... जेवढे प्रश्न विचारले त्यांची सांगोपांग उत्तरं मिळाली. त्यांचं म्हणजे आपणहून कमी बोलणं... पण, विचारलेल्या प्रश्नाचं सविस्तर आणि शास्त्रांचा दाखला देत, प्रश्नकर्त्याच्या कुवतीचा विचार करत समजेल अशा भाषेत उत्तर विश्लेषित करणे, ही त्यांची खासियत ! त्यानंतर अनेक साचलेल्या प्रश्नांसाठी त्यांच्या अनेक भेटी होत गेल्या. माझा पिंड कलाकाराचाच... त्यामुळं कॅरॅक्टर शोधणं, त्याचा अभ्यास करणं स्वाभाविकच ! तो माणूस अभ्यासत गेलो... अभ्यासतोय... पहिल्या भेटीपासूनच एक गोष्ट ओळखली ती म्हणजे हा माणूस

बराच गूढ आहे. त्यांना माझ्या परीनं शोधत गेलो. बऱ्यापैकी आमची मैत्रीही झाली. त्यांच्या माझ्या स्वभावात साम्य अजिबात नाही, पण एखादं तत्त्व साम्य असणारं होतं. ते म्हणजे... भावनिकतेत मैत्रीत किंवा केवळ स्वार्थ साधण्यासाठी खोटे वागणे अथवा बोलणे दोघांनाही आवडत नाही ! त्यातच कला हा विषय सोडता, मला स्वारस्य असणारा दुसरा विषय म्हणजे अध्यात्म आणि ज्योतिष !

पण कितीही मैत्री झाली असली तरी, आमच्यात काही अंतर राहतंच... तो आदर निर्माण व्हाला अनेक गोष्टी कारणीभूत आहेत. त्यापैकी एक म्हणजे... मी तसा सिने, नाट्य इंडस्ट्रीतला माणूस. त्यातले जसे बहुतांशी कलाकार असतात तसा मीही एखादा नाद म्हणा, व्यसन म्हणा, पण बाळगलेला माणूस. या माणसानं अध्यात्म, ज्योतिष हे व्रत अवलंबल्यापासून अभक्ष्य भक्षण-अपेय पान ते सोडाच... चामड्याचे चप्पलही त्यांनी वर्ज्य केलेले आहेत. हे केवळ नियम किंवा कुणी तिसऱ्यानं सांगितलं म्हणून शारीरिक बंधनं घालून घेतली असं नव्हे तर **'हे शास्त्र मनाची-विचारांची आणि आचारांची शुद्धता बाळगली तरच इतरांसाठी प्रभावीपणे प्रेरक ठरू शकते.'** ही राहुलजींची विचारधाराच भावणारी आहे. कारण ज्योतिषाचा पाया हा अध्यात्म आहे, यात शंका नाही !

अध्यात्म-ज्योतिषातील त्यांचा अभ्यास खरंच थक्क करणारा आहे... हे मी नेहमीच चर्चेतून-विवादातून प्रत्यक्ष अनुभवले आणि प्रेरित होऊन जाता जाता त्यांना प्रेमाने गुरुजीही म्हणू लागलो. अनेक वेळा आपल्यावर एका अनामिक शक्तीचा प्रभाव असतो, 'होल्ड' असतो... ज्याला कुणी देव म्हणतं, कुणी निसर्ग, कुणी परमात्मा तर कुणी नशीब म्हणतं... ती कुणाकडून काय करवून घेईल सांगता येत नाही. आता पाहा ना... राहुल कदम यांनी A.T.D. (कला शिक्षक), M.A. (Political Since), M.S.W. (Medical and Psyciatrism) हे पदवी अभ्यास पूर्ण केले. ही गोष्ट पाहता हा माणूस किमान क्लास-२ लेव्हलची कोणतीही नोकरी करत व्यवस्थित संसार सांभाळत बसला असता. पण, केवळ आध्यात्मिक आस्था- ज्योतिषशास्त्राची ओढ आणि या अभ्यासाच्या आधारे आत्मिक समाधान म्हणून अनेकांच्या प्रश्नांना मार्गी लावणे हा त्यांचा प्रामाणिक उद्देश ! धंदेवाईकपणे या क्षेत्राकडे त्यांनी कधी पाहिलेच नाही. मी प्रत्यक्ष पाहतोय-अनुभवतोय... अनेकविध लोक राहुल गुरुजींच्या समोर कोट्यवधींच्या व्यवसायासंबंधी-लाखोंच्या जमीन वादाबाबतीत, संसारातील समस्येविषयी,

लग्नासारख्या गोष्टीबाबतीत आणि भावनिक-वैचारिक-मानसिक अस्वस्थतेविषयी महत्त्वाचे प्रश्न, समस्या घेऊन बसतात... सांगोपांग विश्लेषण, मार्गदर्शन झालं की, त्यांनी विचारलेल्या 'महाराज किती देऊ?' या प्रश्नाचं उत्तर मात्र राहुल गुरुजी केवळ हाताच्या इशाऱ्यानं 'आपल्या इच्छेनं डेस्कवर ठेवा' एवढंच सांगतात आणि समोरचा प्रश्नकर्ता (प्रत्येक जण नव्हे पण, अनेक जण जीवनातल्या अत्यावश्यक प्रश्नांची किंमत केवळ ११ रु., २१ रु., ५१ रु., ठेवून जाताना मी प्रत्यक्ष पाहिलंय.) जी दक्षिणा डेस्कवर ठेवतील ती न पाहता त्याला पुन्हा या असं सांगत, हसतमुखानं अभिवादन करत, बाय बाय करणं ही त्यांची नेहमीची पद्धत! हेच त्यांचं वागणं आदर निर्माण होण्यासारखं आहे... या आदरापोटी आणि श्रद्धेपोटीच मी ही प्रस्तावना वजा शुभेच्छापत्र लिहितोय. कारण, या क्षेत्रातला तज्ज्ञ म्हणून काही लिहिण्याची माझी नक्कीच पात्रता नाही. केवळ या शास्त्राविषयीचा आदर आणि न संपणारी कुतूहलात्मक ओढ... त्याचबरोबर राहुल गुरुजींनी या शास्त्राची साध्या-सोप्या पद्धतीनं उलगडलेली पानं मला जास्त भावली म्हणूनच लिहिण्याचा हा कुवतीनुसार प्रयत्न ! प्रस्तावना त्या त्या विषयातला तज्ज्ञ लिहितो अशी बहुतांशी प्रथा आहेच... पण अत्यल्प ज्ञानावर धंदेवाईक झालेल्या प्रचलित ज्योतिषांबाबतीत राहुल गुरुजींना आस्था नाही आणि ज्यांच्या ज्ञानाबद्दल त्यांना आस्था आहे त्यांच्याशी तसा हक्काचा संबंध नाही की 'माझ्या पुस्तकाची आपण प्रस्तावना लिहा' अशी विनंती राहुल गुरुजी करतील म्हणूनच... केवळ मित्र म्हणून ही प्रस्तावना लिहितोय.

भेटी-चर्चा-विवाद यातून बरंच ज्ञान राहुल गुरुजींच्याकडून सोप्या भाषेत उपलब्ध होत होतं. मधल्या काळात आमच्या स्नेही मनाली जोशी ज्या एका प्रकाशन संस्थेच्या संपादक होत्या त्यांचाही राहुल गुरुजींबरोबर संपर्क झाला. त्यांनाही गुरुजींनी सांगितलेल्या उपाय-उपासनांचा अनुभव आला. महत्त्वाचे म्हणजे संमोहनविरहित साध्या भाषेत विश्लेषण करण्याची पद्धत आवडली. जोशींनी मला विचारलं, ते लिहितील का? ज्योतिष शास्त्रावर काही बोलतात त्याच सोप्या भाषेत? मी गुरुजींना विचारलं. त्यांच्या मित्रमंडळींच्या समोरच सगळ्यांनीच त्यांना आग्रह धरला. त्यांचं एक वाक्य होतं, 'मला लिखाणाचा अनुभव नाही. पण, मी प्रयत्न करतो.' अशा अत्यंत अनौपचारिक पद्धतीनं ही पुस्तक लिखाणाची प्रक्रिया सुरू झाली. लिहायला घेण्यात त्यांनी थोडा वेळ

घालवला, पण लिहून झाल्यानंतर हस्तलिखित कॉपी पाहिली, एकही खाडाखोड नव्हती. आत्मविश्वासपूर्ण लिखाण. पण आज नेमकी पुस्तक छपाईसाठीची पूर्वप्रक्रिया (मुखपृष्ठ, प्रस्तावना, प्रूफरिडिंग) सुरू असताना ते येथे उपलब्ध नाहीत. कारण, त्यांचा 'नर्मदा परिक्रमा' हा आध्यात्मिक प्रवास सुरू असल्यामुळे ते 'नॉट रिचेबल' आहेत. त्यांच्या या उपक्रमास त्यांना मन:पूर्वक शुभेच्छा !

राहुल गुरुजींच्या या पहिल्या-वहिल्या लेखन उपक्रमास सहृदय शुभेच्छा !! आणि अध्यात्म-ज्योतिष या विषयांत रस घेणाऱ्या जिज्ञासू वाचकांना या शास्त्राच्या एका प्रामाणिक साधकाकडून सुलभ भाषेत उपलब्ध झालेल्या 'कुंडली अभ्यास' या पुस्तकाच्या माध्यमातून नक्कीच एक योग्य दृष्टिकोन प्राप्त होईल यात शंका नाही!

शेवटी राहुल गुरुजींना मित्र म्हणून विनंती एवढीच, सामान्य माणसावर नेहमीच दडपण आणणारे कालसर्पयोग, पितृदोष, साडेसाती, मंगळदोष (त्याची उत्पत्ती, कारणमीमांसा आणि उपाय-तोडगे) हे विषयसुद्धा अशाच सुलभ शैलीत विश्लेषित करून त्यावरील तोडग्यांसहित पुस्तक स्वरूपात आणावेत. त्याबरोबरच, आपण काही तथाकथित ज्योतिषांप्रमाणे धंदेवाईक नाही आहात आणि इथून पुढे होणारही नाही, याची आम्हाला खात्री आहेच; पण तरीही व्यावसायिकता म्हणण्यापेक्षा आपल्या ज्ञानाचा आणि सल्ल्याचा गरजू व्यक्तींना जास्तीत जास्त लाभ होईल अशी त्यांनी स्वत:च काहीतरी उपाययोजना करावी, हीच राहुल गुरुजींकडून प्रामाणिक अपेक्षा ! धन्यवाद !!

**- संतोष शिंदे (रंगकर्मी)**